# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### बोरिवली (पूर्व) रेल्वे स्थानकांपासून नॅशनलपार्क हायवेपर्यंत वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता स्कायवॉक बांधण्याबाबत

**(१) २४३३ (२७-०१-२०१५) श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरिवली (पूर्व) रेल्वे स्थानकापासून संजय गांधी राष्ट्रीय उद्यान महामार्गापर्यंत वाहतूक कोंडी होत असून पादचा-यांना त्रास होत असल्याने या ठिकाणी आकाशमार्गिका बांधण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबधित अधिका-यांकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी आकाशमार्गिका बांधण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) मुंबई उपनगरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ ओमकारेश्वर मंदिर येथे पश्चिम द्रुतगती महामार्ग ओलांडण्याकरिता पादचारी पूल बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) बोरीवली (पूर्व) रेल्वे स्थानकापासून पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत महात्मा गांधी रोड येथे आकाशमार्गिका बांधण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सल्लागाराची नेमणुक करण्यात आली असून, सर्वसाधारण आराखडा तयार करण्यात आला आहे.

सदर आकाशमार्गिकेचा पश्चिमेकडील भाग पश्चिम रेल्वेच्या अखत्यारीत येत असल्याने सर्वसाधारण आराखडा पश्चिम रेल्वेला ना-हरकत प्रमाणपत्राकरिता दिनांक ११.०१.२०१९ रोजी सादर करण्यात आला आहे.

तसेच, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत संजय गांधी उद्यान येथे बांधण्यात येणारे मेट्रो स्थानक व बोरीवली स्थानक आकाशमार्गिकेद्वारा एकमेकांना जोडण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पाचा खर्च बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येणार असून, याबाबतची पुढील कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

## मुंबई शहरामध्ये दमा, श्वसनाच्या विकारांबरोबरच क्षय रोगाची मोठ्या प्रमाणात लागण होत असल्याबाबत

**(२) ३१७६८ (२३-०२-२०१६) श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये दमा, श्वसनाच्या विकारांबरोबरच क्षय रोगाची मोठ्या प्रमाणात लागण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ ला निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा असाध्य रोगांपासून मुक्त होण्यापासून शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, उपाययोजनांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत क्षयरोगाला आळा घालण्यासाठी क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

**<u>क्षयरोग व औषध प्रतिरोधी क्षयरोगाच्या त्वरीत निदानासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे</u>**

संशयित क्षयरुग्णांची तपासणी करण्यासाठी महानगरपालिकेच्या ५७ क्षयरोग चिकित्सालये, १३४ मान्यताप्राप्त सुक्ष्मदर्शी केंद्रे, ४ कल्चर डीएसटी प्रयोगशाळा, २० जीन एक्सपर्ट प्रयोगशाळा, ९ डीआर टी.बी. उपचार केंद्रे व ९३२ कम्युनिटी डॉट प्रोव्हायडर्सद्वारे क्षयरुग्णांना मोफत निदान व औषधोपचार करण्यात येतात.

**<u>प्रभावी उपचारांच्या उपलब्धतेसाठी सुधारणा करणे</u>**

• टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समार्फत टी.बी. च्या समुपदेशनासाठी २७ समुपदेशक नेमण्यात आले आहेत.

• शिवडी टी.बी. रुग्णालयामध्ये क्षय रुग्णांसाठी १००० व औषध प्रतिरोधी क्षय रुग्णांसाठी २०० खाटांची सोय उपलब्ध आहे.

• बेडाक्युलीन कंडीशनल ॲक्सेस कार्यक्रम (बेडाक्युलीन अटीसापेक्ष कार्यक्रम) च्या अंतर्गत बेडाक्युलीन हे नवीन औषध अटीसापेक्ष उपलब्ध करण्यात आहे. हे औषध मुंबई ७ विभागातील १०० अत्यंत औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांसाठी वापरण्यात येणार आहे.

**<u>इतर प्रकल्प</u>**

• मुंबईतील गोवंडी सारख्या क्षयरोगाचा अतिप्रादुर्भाव असलेल्या क्षेत्रात एम.एस.एफ. या अशासकीय संस्थेच्या समन्वयाने औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांसाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

• मुंबईतील क्षयरोगाबाबत अतिसंवेदनशील असलेल्या १२ विभागांमध्ये अशासकीय संस्थांच्या मदतीने मे, २०१६ पासून घरोघरी भेट देऊन संशयित क्षयरुग्णांचे त्वरीत निदान करण्यात येत आहे.

• सर्वोदय रुग्णालय, घाटकोपर या खाजगी रुग्णालयात औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांना बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा नव्याने उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन उपचार केंद्र लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

• किरकोळ औषध विक्रेते यांच्यामार्फत संशयित क्षयरुग्णांना निदानासाठी मार्गदर्शन करणे व औषधांच्या दुकानांमध्ये क्षयरोग संदेशाची भित्तीपत्रके व माहितीपत्रके प्रदर्शित करण्यासाठी त्यांच्या सहभागाकरिता माहितीपर कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.

---

## राज्यातील नागरी भागामध्ये हरित शहर योजना लागू करण्याबाबत

**(३) ३६८८९ (२५-०२-२०१६) डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी भागामध्ये हरित शहर योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नागरी संस्थांना तसे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्देशानुसार कोल्हापूर महानगरपालिकेने कृति आराखडा तयार केला आहे काय व त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी रु. ५१,०४,७३२/- रक्कमेस प्रशासकीय मंजूरी झालेली आहे. त्यानुसार २८०० मोठी झाडे व २८०० लहान झाडे लावणे कामी मान्यता झालेली असून सदर कामांची निविदा प्रक्रिया राबवून काम पुर्ण झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे खाडीतून अंतर्गत जलवाहतूक सेवा सुरु करण्याबाबत

**(४) ६७५८५ (२३-०१-२०१७) ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५४८ (४)

(१) ठाणे, नवी मुंबई, मुंबईसह येथील वाहतूक सेवेवरील ताण कमी करण्यासाठी मुंबई नजीकच्या महापालिकांतर्गत जलवाहतूक सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्रीय नौकानयन मंत्रालयाच्या सागरमाला या योजनतून करण्यासाठी केंद्र शासनाकडे माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-मीरा-भाईंदर-ठाणे कोलशेत, घोडबंदर रोड, साकेत-दिवा, भिवंडी-कल्याण असा जलवाहतूक मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलवाहतूक सेवा लवकरात लवकर सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रस्ताव केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे काय तसेच जलवाहूक त्वरीत सुरु करण्याच्यादृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेवरील आणि रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी जलवाहतुक सेवा सुरू करण्यासाठी खालील सविस्तर प्रकल्प अहवाल ठाणे महानगरपालिकेतर्फे तयार करण्यात आला आहे.

- प्रथम टप्पा:- जलवाहतुक मार्ग क्र.५३ करिता कोलशेत येथे मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब व ९ ठिकाणी - वसई, मिराभाईंदर, घोडबंदर, नागला, काल्हेर, अंजूर दिवे, पारसिक, डोंबिवली (ठाकूर्ली) व कल्याण या ठिकाणी जेट्टी बांधणे आणि अनुषंगिक सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.
- द्वितीय टप्पा:- ठाणे - मुंबई दरम्यान १० ठिकाणी (साकेत, कळवा, विटावा, मीठबंदर, ऐरोली, वाशी, ट्रॉम्बे, एलिफंटा, फेरीव्हार्फ, गेट वे ऑफ इंडिया) व ठाणे - नवी मुंबई दरम्यान ८ ठिकाणी (वाशी, नेरुळ, बेलापूर, तळोजा, जुई गाव, पनवेल, जे.एन.पी.टी. आणि मोरा) जेट्टी बांधणे आणि अनुषंगिक सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.
- उक्त सविस्तर प्रकल्प अहवालास भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली यांनी मान्यता दिली आहे. जलमार्ग क्र. ५३ जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना निहित असल्याने, सदर प्रकल्प अंमलबजावणीसंदर्भात जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी ठाणे महानगरपालिकेशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले आहेत.
- ठाणे महानगरपालिकेने दिनांक ०६.१२.२०१८ च्या पत्रान्वये जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना आवश्यक पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील, खारघर येथील हेक्स सिटी गृह प्रकल्प ग्राहकांनी स्थापन केलेल्या संस्थेस हस्तांतरीत करण्याबाबत**

**(५) ७४२३९ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील, खारघर येथील, सीएसक्र. ९१,९४,९५ सह ६ भूखंडावर राबविण्यात येत असलेल्या हेक्स सिटी गृह प्रकल्पाचे बांधकाम रखडल्यामुळे सदरहू भूखंड ग्राहकांनी स्थापन केलेल्या संस्थेला हस्तांतरीत करण्यात यावा अशी मागणी प्रकल्पात गुंतवणूक केलेल्या ग्राहकांच्या हेक्स वर्ल्ड वेल्फेअर असोसिएशनने मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पात, २,३४४ ग्राहकांनी, गुंतवणूक केली असून यामध्ये त्यांची फसवणूक झाली असल्याने, सदरहू ग्राहकांच्या वेल्फेअर असोसिएशनला, गृह प्रकल्प राबविण्यासाठी, भूखंड हस्तांतरीत करण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०२-२०१९) :** (१) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन ई- ऑफिस प्रणालीवर प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्याबाबत**

**(६) ९१३१३ (०४-०९-२०१७) श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी गृहनिर्माण विभागाने दिनांक १४ जून, २०१६ रोजी परिपत्रक काढून आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी केली परंतु मागणी केल्यानुसार नियोजन प्राधिकरणाने प्रमाणित केलेले बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्राची अट कमी करण्यात आली नाही,हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्राची अट काढून टाकण्याबाबत लोकप्रतीनिधींनी दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्राची अट काढून टाकण्यासाठी शासन कार्यवाही करित आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) मानीव अभिहस्तांतरणासंदर्भात गृहनिर्माण विभागामार्फत दि. १४.०६.२०१६ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

तदनंतर दि. १८.०९.२०१७ च्या गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णयान्वये बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्राची अट कमी करण्यात आली होती.

कालांतराने या विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेले, तसेच महसूल व वन विभाग इ.मार्फत निर्गमित करण्यात आलेले या पूर्विचे सर्व आदेश अधिक्रमित करून सहकार विभागाने दि. २२.०६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मानीव अभिहस्तांतरणाबाबत नव्याने कार्यपध्दती सुनिश्चित केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गिरणी कामगारांसाठी बांधलेल्या घरांच्या सोडतीमधील ज्या कामगारांनी म्हाडाकडे सदनिकांचे पैसे वेळेवर भरले नाहीत त्यांच्या घरांचा हक्क म्हाडाने काढून घेतल्याबाबत**

**(७) १०५३०२ (०३-०४-२०१८) श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सन २०१२ मध्ये म्हाडाने गिरणी कामगारांसाठी बांधलेल्या घरांच्या सोडतीमधील ज्या कामगारांनी म्हाडाकडे सदनिकांचे पैसे वेळेवर भरले नाहीत त्यांच्या घरांचा हक्क म्हाडाने काढून घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने गिरणी कामगारांना कळविल्यानंतर सोडत लागलेल्या पण वेळेत पैसे न भरलेल्या कामगारांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते परंतू त्यांच्या घरांचा हक्क हिरावून घेता येत नाही, ती घरे संबंधित कामगारांनाच मिळाली पाहिजेत अशी मागणी करणारे निवेदन मुख्याधिकारी, म्हाडा यांना राष्ट्रीय मिल मजदूर संघ व लोकप्रतिनिधींनी वारंवार दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने म्हाडाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०२-२०१९) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

गिरणी कामगार कृती संघटनेने दि. २५.०७.२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये ज्या गिरणी कामगारांनी १०% रक्कमेचा भरणा केला आहे परंतु उर्वरित ९०% रक्कम विहित मुदतीत अदा करता आली नाही अशा गिरणी कामगारांना ६ महिन्यांची विलंब शुल्कासह भरणा करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत मागणी केली.

(३) सदर मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांनी मान्य करुन अशा अर्जदारांनी दि. ३१.०८.२०१८ पर्यंत अर्ज सादर करणेबाबत जाहिर निवेदनही प्रसिध्द करण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिडकोने प्रकल्पग्रस्तांना मैदान, समाजमंदिर, व्यायामशाळा, उद्यान, विरंगुळा केंद्र, अभ्यासिका अशा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(८) १०५३९५ (१२-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराची निर्मिती करतांना सिडको व एमआयडीसीने परिसरातील ग्रामस्थांच्या जमिनी संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिन संपादित करतेवेळी ग्रामस्थांना मैदान, समाजमंदिर, व्यायामशाळा, उद्यान, विरंगुळा केंद्र, अभ्यासिका अशा सुविधा उपलब्ध करून देऊ असे आश्वासित केले होते याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) विरंगुळा केंद्रांसाठी प्रकल्पग्रस्तांच्या नोंदणीकृत संस्थांकडून वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे अर्ज मागवून त्यांचे वाटप करण्याचे धोरण सिडकोने ठरविले आहे.

तसेच नवी मुंबई प्रकल्पासाठी सदर जमिनी संपादित करतेवेळी प्रत्येक नोडमध्ये सिडकोमार्फत ग्रामस्थांसाठी मैदान, समाजमंदिर, व्यायामशाळा, उद्यान, महिला मंडळ इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडूनही नवी मुंबई महानगरपालिकेस ग्रामस्थांना मैदान, समाजमंदिर, व्ययामशाळा, उद्यान, विरंगुळा केंद्र, अभ्यासिका इ. सार्वजनिक सुविधा पुरविण्याकरिता भुखंडांचे वाटप नाममात्र दराने करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगृह व ईशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या मुंबई महानगरपालिकेच्या सेवानिवासात वास्तव्यास असलेल्या सफाई कामगारांना स्वत:च्या मालकी हक्काची घरे मिळण्याबाबत**

**(९) १२६७१३ (०५-१२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने राज्यातील महानगरपालिका / नगरपालिकेमधील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम लक्षात घेवून ज्या सफाई कामगारांची २५ वर्षे किंवा त्याहून अधिक वर्षे सेवा झाली आहे अशा कामगारांना सेवानिवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत

मृत्यू झाल्यास अशा कामगारांच्या पात्र वारसांना महानगरपालिका / नगरपालिकेकडून मालकी हक्काने २६९ चौ. फुट चटई क्षेत्राची सदनिका मोफत देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपंचायती यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या सध्याच्या सेवानिवासस्थानांच्या ठिकाणी सफाई कर्मचाऱ्यांची सेवा निवासस्थाने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेच्या निकषानुसार मोफत सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी ४.०० कमाल चटई क्षेत्र निर्देशांकांच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५० % सदनिका सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५० % सदनिका डॉ. बाबसाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना किंवा सेवेत असताना मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत करून देण्याचे योजिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनींवर वरील शासन निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी या शासन निर्णयामधील तरतुदींचा मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भाव होण्याची नितांत आवश्यकता असतानाही शासनाने दिनांक ०८ मे, २०१५ रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार लागू होणाऱ्या मुंबईसाठीच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली सन २०३४ मध्ये वरील शासन निर्णयातील तरतुदींचा कोणताही अंतर्भाव करण्यात आला नव्हता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजगृह व ईशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित), महानगरपालिका वसाहत, डॉ. ई. मोजेस मार्ग, वरळी नाका, मुंबई या महानगरपालिकेच्या सेवानिवास्थानात वास्तव्यास असलेल्या महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना स्वत:च्या मालकी हक्काची घरे मिळण्याकरिता मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली सन २०३४ मध्ये उपरोक्त शासन निर्णयामधील तरतुदींचा अंतर्भाव करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे जुलै, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना स्वत:च्या मालकी हक्काची घरे मिळण्याकरिता मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली सन २०३४ मध्ये उपरोक्त शासन निर्णयामधील तरतुदींचा अंतर्भाव करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :**

(१) व (२) होय हे खरे आहे.

(३) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(३)(A) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या जमिनीवर महापालिका तसेच इतर प्राधिकरणांच्या कर्मचाऱ्यांचे

निवास्थान विकसित करण्यासंबंधी तरतुद अंतर्भत करण्यात आली आहे. तर विनियम ३३(३)(B) मध्ये खाजगी जमिनीवर शासकीय अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने विकसित करण्याची तरतूद अंतर्भूत असून त्यामधील उपखंड १ मधील शेवटच्या परिच्छेद (iii) मध्ये श्रमसाफल्य योजनेच्या तत्वानुसार मालकी हक्काची घरे उपलब्ध करण्यासंबंधी तरतूद अंतर्भुत करण्यात आली आहे.

(४) होय हे खरे आहे.

(५) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४मध्ये श्रमसाफल्य योजनेच्या तत्वानुसार मालकी हक्काची घरे उपलब्ध करण्यासंबंधी तरतूद अंतर्भुत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी (जि.नांदेड) येथील पंदे कंन्स्ट्रक्शन कंपनीला महानगरपालिकेने २ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असल्याबाबत**

**(१०) १२७०६३ (०४-१२-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात ब्रम्हपूरी भागामध्ये बीएसयुपी योजनेतंर्गत मंजूर झालेल्या पायाभूत सुविधा करुन देण्यास विलंब व वेळकाढू धोरण अवलंबिल्यामुळे महापालिकेने पंदे कंन्स्ट्रक्शन कंपनीला सुमारे २ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संबंधित एजन्सीकडून दंडाची रक्कम वसुल न करता स्थायी समितीच्या बैठकीत दंडाची रक्कम माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०२-२०१९)** (१) व (२) हे खरे नाही.

बीएसयुपी योजनेंतर्गत ब्रम्हपूरी भागातील १६७८ घरकुलास केंद्र शासनाकडून दिनांक २०.११.२०१२ रोजी मंजुरी प्रदान करण्यात आली होती. तद्‌नंतर लाभार्थ्यांनी केलेल्या असहकार्यामुळे सदर प्रकल्पातील ६१० घरे रद्द करुन तो प्रकल्प १०६८ घरासाठी सिमित करण्यात आला होता. सद्य:स्थितीत १०६८ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून, लाभार्थी घरकुलांमध्ये रहात आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईत सिडकोने उभारलेल्या जेएन-१, जेएन-२ च्या धोकादायक झालेल्या इमारतीतील घरांचे हस्तांतरण करता येणार नसल्याबाबत**

**(११) १२७३३६ (०६-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत सिडकोने उभारलेल्या जेएन-१, जेएन-२ च्या धोकादायक झालेल्या आणि पुनर्विकासाची परवानगी देण्यात आलेल्या इमारतीतील घरांचे हस्तांतरण करता येणार नसल्याचा निर्णय माहे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे धोकादायक इमारतींचा पुनर्विकासात अडचणी येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) सिडकोकडून अपार्टमेंटच्या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला ना-हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये पुनर्विकासाच्या प्रक्रियेमध्ये अपार्टमेंट धारकांच्या हस्तांतरणास, अपार्टमेंट धारकाचे निधन झाल्यास वाटपाबाबतच्या हस्तांतरणास अपवाद करुन प्रतिबंध केलेला आहे. यामध्ये मूळ विद्‌यमान अपार्टमेंट धारकांना लाभ व्हावा हा उद्देश आहे.

---

**कोल्हापूर शहरात एलईडी दिवे बसविण्यात येणार असल्याबाबत**

**(१२) १२७५३१ (०४-१२-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात शासनाच्या योजनेप्रमाणे संपूर्ण किती ठिकाणी आणि किती वॅटचे एलईडी दिवे बसविण्यात येणार आहे याबाबतचा अहवाल तयार करण्याचे आदेश माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याकरिता किती खर्च येणार आहे व किती कालावधीत हे काम पूर्ण होण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.०४ जून, २०१८ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उर्जा बचतीसाठी एल.ई.डी. पथदिवे बसविण्याकरीता ईईएसएलसोबत करारनामा करण्याबाबत सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा/नगरपंचायती यांना निर्देश दिले आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) एल.ई.डी. दिव्यांसाठी ईईएसएलसोबत करारनामा करणे व त्यांच्या माध्यमातून उर्जा बचत उपक्रम राबविणे तसेच शासन निर्णयातील अनुषंगीक बाबींच्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु असल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळातर्फे (सिडको) खारघर येथे बांधण्यात आलेल्या गोल्फ कोर्समध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१३) १२७५३५ (०६-१२-२०१८) अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळातर्फे (सिडको) खारघर येथे बांधण्यात आलेल्या गोल्फ कोर्समध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून अधिकारी-ठेकेदार आणि प्रकल्पाचे सल्लागार यांच्या संगनमतातून हा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.९७९५, दि.३०.०१.२००८ नुसार खारघर सेक्टर-२२ येथे गोल्फ कोर्सच्या प्रकल्पासाठी अंदाजे रु.२५ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली. वृत्तपत्रांमध्ये निविदा देऊन प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. कॉन्टीनेंटल फेअरवेज ही कंपनी अर्हता प्राप्त झाल्यानंतर गोल्फ कोर्सच्या विविध कामांसाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे.ए.सी.इ.फाउंडेशन च्या अहवाल व सल्ल्यानुसार मे. कॉन्टीनेंटल फेअरवेज कंपनीस काम प्रदान करण्यात आले आहे.

सार्वजनिक उपक्रम समितीच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या साक्ष मध्ये झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर कामाची चौकशी करण्याकरिता सिडकोने दि.२८.०८.२०१८ रोजी द्विसदस्यीय समिती गठीत केली असून समितीचा चौकशी अहवाल लवकरच अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेतील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१४) १२७५३७ (०५-१२-२०१८) श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेतील अनेक पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणासाठी २७ पदांना शासनाने मंजूरी देऊन तसे नगरविकास विभागाकडून प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देऊनही अद्यापही ही पदे भरली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामकाजात कालबाहय ठरलेली ६३६ पदे रद्द होऊन नव्याने ४१४ पदे निर्माण करण्यात येऊन याबाबतच्या प्रशासनाने तयार केलेल्या आकृतिबंधास महासभेने दोन वर्षापूर्वी मान्यता देऊनही अद्यापही यासंदर्भात कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) महानगरपालिकेतील वर्ग-१ ते वर्ग-४ ची ११०८ पदे रिक्त असल्याची वस्तुस्थिती कोल्हापूर महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) अशा आशयाचे पत्र कोल्हापूर नागरीक्षेत्र विकास प्राधिकरणास पाठविण्यात आले होते, हे खरे आहे.
(३) कोल्हापूर महानगरपालिकेने कालबाह्य ठरलेली ६३६ पदे रद्द करुन नव्याने ४१४ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव महासभेसमोर सादर करण्यात आला होता.
• तथापि, महासभेने पदाधिकारी, गटनेते, संघटना प्रतिनिधी व प्रशासनाने एकत्रित बैठकीमध्ये चर्चा करावी व सर्व संम्मतीने फेरप्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महासभेने दिल्या आहेत.
• त्यानुषंगाने सदर प्रकरणी कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेच्या अहवालात नमूद आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा तालुक्यातील वाडा-भिंवडी महामार्गावर गांधारे गावाजवळ अनधिकृत डंम्पिंग ग्राऊंडवर शहरातील कचरा टाकण्यात येत असल्याबाबत

**(१५) १२८५९० (०६-१२-२०१८) श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा तालुक्यातील वाडा-भिंवडी महामार्गावर गांधारे गावाजवळ अनधिकृत क्षेपणभूमीवर (डंपींग ग्राऊंड) संपूर्ण शहरातील कचरा टाकण्यात येऊन त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत नसल्याने परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्था क्षेपणभूमीकरिता जागा उपलब्ध करुन देण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने वाडा तालुक्यातील जनतेने क्षेपणभूमीसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी म्हणून शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाडा शहराला क्षेपणभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) वाडा शहरातील नागरीकांना कचऱ्याच्या दुर्गंधीचा त्रास होत असल्याबाबत कोणतेही लेखी तक्रार नगरपंचायतीकडे प्राप्त झालेली नाही, असे जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अहवालात नमूद आहे.

• वाडा शहरालगत असलेली खाजगी मालकीची गांध्रे गावाजवळील क्षेपणभूमीची जागा खाजगी मालकाने दिलेल्या परवानगीनुसार ग्राम पंचायत काळापासून क्षेपणभूमीसाठी वापरण्यात येत आहे.

• वाडा नगरपंचातीची स्थापना दि.०६/०४/२०१७ रोजी झाली असून सद्यस्थितीत सदर जागेचाच वापर नगरपंचायतीकडून क्षेपणभूमीसाठी करण्यात येत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेख्यात आढळून येत नाही.

(३) वाडा शहराकरीता क्षेपणभूमीसाठी शासकीय जागा उपलब्धतेबाबत कार्यवाही सूरु असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवणी मालाड ( पश्चिम) मुंबई येथील नागरी आरोग्य केंद्रात**
**त्वचा रोग तज्ञ तसेच औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) १२८६९६ (०६-१२-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.ई.एम नागरी आरोग्य केंद्र, गेट नं.६ माऊंट मेरी हायस्कुल समोर मालवणी मालाड (पश्चिम) मुंबई येथील नागरी आरोग्य केंद्रात त्वचा रोग तज्ञ उपलब्ध करुन देणे, खाज, गजकर्ण या रोगाचे निमूर्लन करण्यात यावे व रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्यात यावी अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री, महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका उपायुक्त व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१८ व २ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदानातून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात डॉक्टर व औषधे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१९) :** (१) अशा आशयाचे निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) त्वचेच्या बुरशीचा प्रादुर्भाव झालेले दिडशेपेक्षा जास्त रुग्ण रोज के.ई.एम. रुग्णालयात उपचारासाठी येतात. त्याकरिता प्रभावी औषधे लोकल खरेदी करुन आरोग्य केंद्राकडे पाठविण्यात आली होती व या औषधांचा महानगरपालिकेच्या अनुसूची-२ मध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

रुग्णांना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन पत्रकाने मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच, मालवणी केंद्रातील सर्व डॉक्टरांना त्वचा रोगाचे निदान व औषध पध्दतीबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे गजकर्ण आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना पहिल्या तपासणीत अचूक निदान व औषधे मिळू शकतील असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील राणीबागेत नविन पिंजरे उभारण्याच्या दिलेल्या कंत्राटाबाबत**

**(१७) १२९१२६ (०६-१२-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील राणीबागेत नवीन प्राण्यांसाठी पारदर्शक असणारे आणि त्यांच्यासाठी वातावरणात अनुकूल असणारे पिंजरे उभारण्यात येणार असुन सदरहू पिंज-यांच्या बांधकामात वादग्रस्त ठरलेल्या हायवे कन्स्ट्रक्शनला पुन्हा एकदा कंत्राट देण्यात येणार असल्याचा प्रस्ताव स्थायी समितीत मंजूर करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१९) :** (१) व (२) हम्बोट पेंग्वीन पक्ष्यांकरिता दर्शनीय गॅलरी उभारणीच्या कामासंबंधी झालेल्या दिरंगाईबाबत मा. लोकायुक्त, मुंबई यांनी दिनांक ११.०८.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शहर) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करुन, हम्बोट पेंग्वीन कक्ष उभारणीच्या कामास झालेल्या विलंबाबाबत मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीकडून उचित दंड वसुली करण्यात आली आहे.

तसेच, प्राणीसंग्रहालयामध्ये येणाऱ्या नवीन प्राण्यांसाठी वातावरणास अनुकूल असे १० नवीन पिंजरे बांधण्याकरिता लघुत्तम निविदाकार मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी यांची स्थायी समितीच्या दिनांक ०८.०८.२०१८ रोजीच्या ठरावानुसार नियुक्ती करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील शाळांचे लेखा परिक्षण (ऑडिट) हे महानगरपालिका शिक्षण विभागाकडे उपलब्ध नसल्याबाबत

**(१८) १२९१२९ (०६-१२-२०१८) श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील शाळांचे लेखा परिक्षण (ऑडिट) हे महानगरपालिका शिक्षण विभागाकडे उपलब्ध नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध माध्यमांच्या आणि बोर्डाच्या शाळा पालकांची वेगवेगळया पध्दतीने शुल्कवाढीच्या तर कधी शैक्षणिक साहित्याच्या नांवाखाली लूट करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वास्तविक बालकांच्या सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ प्रमाणे आणि शाळेला देण्यात येणा-या नमुना २ च्या अटी व शर्ती क्रमांक १५ प्रमाणे शाळा व्यवस्थापनाने जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडे दरवर्षी शाळेचे लेखा परीक्षण (ऑडिट) चार्टर्ड अकाऊंटटची मान्यता घेऊन रीतसर अकाऊंट स्टेटमेंट सादर करणे अनिवार्य आहे परंतू असे करण्यात येत नसल्याने संबंधित महानगरपालिका शाळांमध्ये विदयार्थ्यांच्या पालकांमध्ये रोष निर्माण झाला आहे तरी याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे लेखा परिक्षण हे महानगरपाकि मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, बेलापूर तसेच, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-१) यांचेमार्फत वेळोवेळी केले जात असून, त्याबाबतचा अहवाल शिक्षण विभागाकडे उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) खाजगी प्राथमिक शाळांच्या शुल्कवाढीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले तक्रार अर्ज आवश्यक कार्यवाही करण्याकरिता शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांना पाठविण्यात आले आहेत.

(३) व (४) शाळा अनुदान सहाय्य संहिता, १९६८ मधील नियम क्र. १ अन्वये शाळांना मान्यता देण्यासाठी व बालकांच्या सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील नियम क्रमांक १५ अन्वये नमुना-२ अंतर्गत मान्यता देण्यासाठी शाळेचे मागील तीन वर्षांचे लेखा परिक्षण सादर करणे आवश्यक असून, त्यानुसार लेखापरिक्षण अहवाल सादर केले जातात.

यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी शाळेतील व्यवस्थापक, मुख्याध्यापक आणि सचिव यांना नमूद अधिनियमानुसार शाळेचा प्रत्येक वर्षाचा लेखापरिक्षण

अहवाल उपशिक्षणाधिकारी यांना सादर करण्यासाठी दिनांक २५.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये आदेश देण्यात आले आहेत.

तसेच, नमूद अधिनियमानुसार शाळेचा प्रत्येक वर्षाचा अहवाल सादर न करणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्यासाठी प्रस्तावित येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**खोपोली (जि.रायगड) नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयात जुन्याच औषधांचा वापर केला जात असल्याबाबत**

**(१९) १२९१४७ (०६-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथे पावसाळयात अनेक आजारांना सामोरे जावे लागत असल्याने शासकीय रूग्णालयात अनेक प्रकारच्या औषधांचा साठा असणे गरजेचे असून ती औषधे उपचारासाठी आलेल्या रूग्णांसाठी वापरणे गरजेचे असताना नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात जुनी औषधे गरोदर महिला व जुलाब होत असलेल्या रूग्णांना देण्यात आल्याचा प्रकार दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरोदरपणात महिलांना रक्त वाढीसाठी गोळयांचा वापर केला जातो त्या गोळयांची मुदत दिनांक २४ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारस संपलेली असतानाही त्याचा वापर झालेला असल्याने खोपोलीच्या नगरसेविकांनी वैद्यकीय अधिकारी खोपोली नगरपालिका यांचेकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) अशा प्रकारची घटना घडली नसल्याची बाब खोपोली नगरपरिषदेने कळविली आहे.

(२) अशा आशयाची तक्रार नगरसेवकांनी खोपोली नगरपरिषदेकडे केली, ही वस्तुस्थिती आहे.

• तथापि, सदर गोळ्यांची मुदत संपली असल्याने सदर गोळ्यांचा वापर करण्यात आलेला नाही. त्या गोळ्या डिस्पोज करण्यासाठी स्टोर रुममध्ये बाजूला ठेवण्यात आलेल्या होत्या, असे नगरपरिषदेने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) सदर प्रकरणाची नगरपरिषदेमार्फत चौकशी करण्यात येत असून वैद्यकीय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात साडेतीन वर्षात ४५ हजार ५९८ जणांना श्वानदंश झाला असल्याबाबत**

**(२०) १२९५१६ (०६-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात भटक्या कुत्र्यांमुळे शहरवासियांना जीव मुठीत धरून रहावे लागत असून गत साडेतीन वर्षात ४५ हजार ५९८ जणांना श्वानदंश झाला असून श्वानदंशाचे प्रमाण दरवर्षी ५० टक्क्यांनी वाढत असल्याने रायगड जिल्हयात गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्वान निर्बिजीकरणासाठी प्रत्येक कुत्र्यामागे ७२७ रूपये खर्च केले जातात म्हणजेच या कामात वर्षभरात सुमारे लाखांचा खर्च झाला असला तरीही आजमितीस भटक्या कुत्र्यांचा उपद्रव कमी झाला नसल्यामुळे श्वान निर्बिजीकरणासाठी खर्च करण्यात आलेले लाखो रूपये वाया जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भटक्या कुत्र्यांना परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) रायगड जिल्ह्यातील पेण,महाड, कर्जत, पोलादपूर व माथेरान नगरपरिषदांच्या हद्दीमध्ये श्वानदंश झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे.

(२) कर्जत नगरपरिषदेने श्वानांचे निर्बिजीकरणावर रू.२.८५ लक्ष इतकी रक्कम खर्च केली आहे.

• रायगड जिल्ह्यातील उर्वरित नगरपरिषदांकडून श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचे संबंधित नगरपरिषदांनी कळविले आहे.

(३) शासनाने दिनांक ११/०८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "कुत्र्यांची वाढती संख्या मर्यादीत ठेवण्यासाठी, रेबीज निर्मुलनासाठी आणि मनुष्य-कुत्रा संघर्ष टाळण्यासाठी राज्यस्तरीय देखरेख समिती" स्थापन केलेली आहे.

• रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधील श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण करण्याच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली नगरपंचायत मुख्याधिकारी यांची खोटी सही करून तक्रार निकाली काढणाऱ्या नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक यांचे शासकीय सेवेतून निलंबन करण्याबाबत**

**(२१) १२९८६८ (०७-१२-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५४८ (१८)

(१) कणकवली नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री.मनोज उकिर्डे हे दिनांक २२ जून २०१८ रोजी दीर्घकालीन रजेवर गेले होते व दिनांक २५ जून २०१८ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी कणकवली नगरपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार श्री.देवानंद ढेकळे यांचेकडे दिला होता व त्यांनी तो दिनांक ३० जून २०१८ रोजी वा त्या सुमारास स्वीकारला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही करण्यासंदर्भात नगरविकास विभागाच्या अधिकारी यांनी दिनांक २२ जून, २०१८ रोजी मुख्याधिकारी कणकवली यांना पत्र पाठवले होते व मुख्याधिकारी कणकवली यांच्या अनुपस्थितीत कार्यालयीन अधिक्षक श्री. विठ्ठल साटम यांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग किंवा जिल्हा प्रशासन अधिकारी यांची पूर्वपरवानगी न घेता अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३० जून २०१८ रोजी वा त्या सुमारास श्री.देवानंद ढेकळे यांनी कणकवली नगरपंचायतीचा कार्यभार स्वीकारलेला असताना मे.निर्माण रियलेटर्स कंपनीने राष्ट्रीय महामार्गालगत केलेल्या अनधिकृत बांधकामाची तक्रार निकाली काढताना श्री.विठ्ठल साटम यांनी थेट कणकवली नगरपंचायतीचे मुख्याधिकारी म्हणून स्वाक्षरी करून तक्रारदार श्री.प्रशांत लाड यांची तक्रार निकाली काढली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कणकवली नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक श्री. विठ्ठल गोविंद साटम यांचे शासकीय सेवेतून निलंबन करण्याबाबत श्री. प्रशांत लाड यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार केली होती व जिल्हाधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कार्यालयीन अधीक्षक यांच्यावर करण्यात येणाऱ्या कारवाईची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिक्षक यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये त्यांनी शासनाशी पत्र व्यवहार केला आहे. तसेच सदर बांधकामास तत्कालीन मुख्याधिकारी यांनी बांधकाम परवानगी दिली असल्याने अधिक्षकांनी अनधिकृत बांधकामाचे संरक्षण केले, ही बाब खरी नसल्याचे नगरपंचायतीने आपल्या अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रभारी मुख्याधिकारी यांनी पदभार स्विकारण्यापूर्वी कार्यालयीन अधिक्षकांनी श्री. प्रशांत लाड यांच्या तक्रारीस उत्तर दिलेले आहे. परंतू, तक्रार अर्ज निकाली काढला नसल्याची वस्तुस्थिती नगरपंचायतीने कळविली आहे.
(४) व (५) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने मुख्याधिकारी यांच्या प्राप्त अहवालावरुन सदर तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नसल्याने संबंधित कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात आली नसल्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कळविले आहे.

---

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील शेडोली व खोपोली परिसरात जलवाहिनीत ॲसिडसदृश रसायन मिसळण्यात आल्याबाबत**

**(२२) १२९९६३ (०७-१२-२०१८) श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील शेडोली व खोपोली परिसरात जलवाहिनीत दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास ॲसिडसदृश रसायन मिसळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोपोली शहरात पाणी पुरवठा करणारी चिंचवली-शेडोली ही प्रमुख जलवाहिनी असून या जलवाहिनीत ॲसिडसदृष्य रसायनामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) नगरपरिषदेच्या अहवालानुसार खोपोली नगरपरिषद हद्दीतील शेडवली भागामधील मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम नगरपरिषदेमार्फत सुरु होते.

- दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी सकाळी नगरपरिषदेचे संबंधित कर्मचारी सदर ठिकाणी काम करण्यास गेले असता, जलवाहिनीजवळील नाल्यात व शेत जमिनीत ॲसिड सदृश्य रसायन त्यांच्या निदर्शनास आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी जेव्हा सदर बाब निदर्शनास आली तेव्हा जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरु असल्याने सदर ठिकाणी पाणीपुरवठा बंद होता. सदर जलवाहिनी नगरपरिषदेमार्फत तातडीने दुरुस्त करण्यात आली.

- तद्नंतर या ठिकाणी असलेली २० मीटर लांबीची जलवाहिनी बदलण्यात आली असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला, अशी वस्तुस्थिती नाही.
- उपरोक्त प्रकरणी अज्ञात इसमाविरुध्द पोलीस ठाणे, खोपोली येथे दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी नगरपरिषदेने गुन्हा दाखल केला आहे, असे नगरपरिषदेच्या अहवालात नमूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिडकोच्या १५ हजार घरांच्या सोडतीमध्ये गोंधळ झाल्याबाबत**

**(२३) १२९९९५ (०७-१२-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या १५ हजार घरांच्या सोडतीमध्ये गोंधळ झाल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून सिडकोकडे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांकडून कोणकोणत्या तक्रारी करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या तक्रारी निवारणार्थ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :**
(१), (२) व (३) होय,

माहे ऑक्टोबर, २०१८ मधील सिडकोच्या सोडतीमध्ये मुख्यत: एका अर्जदारास एका पेक्षा जास्त सदनिकांचे वाटप करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

तथापि, माहे ऑक्टोबर, २०१८ मधील सोडतीच्या योजना पुस्तिकेमधील अट क्र.४.११ मध्ये अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानुसार पात्र असलेल्या योजना संकेतासाठी अर्ज करु शकतात. मात्र एकापेक्षा जास्त पात्र योजना संकेतासाठी अर्ज करावयाचा झाल्यास प्रत्येक संकेत क्रमांकासाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज भरणे आवश्यक आहे. जर अर्जदार एकापेक्षा जास्त योजना संकेत क्रमांकामध्ये यशस्वी झालाच तर निकाल जाहीर झाल्यानंतर १ महिन्याच्या आत कोणत्याही एकाच योजना संकेतासाठी सिडकोकडे पसंती कळवणे आवश्यक आहे. त्यानुसार संगणकीय सोडतीमध्ये सरमिसळ पद्धतीचा वापर करुन सोडतीचा निकाल दि.०२.१०.२०१८ रोजी  जाहीर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत, अर्जदारांकडून अर्जाबाबत दाखल केलेल्या माहितीची छाननी सिडकोकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि. ठाणे) येथील खेमानी नाल्याचे पाणी उल्हास नदीमध्ये सोडण्यात येत असल्याबाबत

**(२४) १३०००३ (०७-१२-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि. ठाणे) येथील खेमानी नाल्याचे पाणी उल्हासनदीमध्ये सोडण्यात आल्याने व त्या ठिकाणाहून एमआयडीसीमार्फत शहराला पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामृळे दुषीत पाण्याने नागरिकांचे आरोग्यावर परिणाम होत असल्याने शासनाने खेमानी नाल्याचा प्रवाह बदलून सेंचूरी कंपनीजवळ मोठया विहीरीत आणून पंपिगव्दारे शांतीनगर येथील केंद्रात सोडले तेथे पाण्यावर प्रक्रीया करुन नंतर वालधूनी नदीत सोडण्याची योजना मंजूर करुन सदर योजनेसाठी शासनाने ३६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचे काम अतिशय संथ गतीने सुरु असून त्याबाबत तत्कालीन आयुक्त यांनी कंत्राटदारावर ठपका ठेवून रोज ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला असून कंत्राटदाराने दंडाची रक्कम भरली नाही व कामसुध्दा अदयाप पूर्ण केले नसल्याने नागरिकांना दुषित पाणी प्यावे लागते ही बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित ठेकेदाराने योजनेचे काम जलद गतीने करण्यासाठी तसेच कंत्राटदाराला ठोठावलेल्या दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :**
(१) व (२) उल्हासनगर महानगरपालिकेने स्वनिधीतून रु. ३६ कोटीच्या योजनेंतर्गत खेमानी नाला वळविण्याचे काम हाती घेतली असून, खेमानी नाल्याजवळ बंधारा बांधून संप आणि पंप हाऊसद्वारे ६०० मि.मी. व्यासाच्या उध्दरण वाहिनीतून शांतीनगर मलप्रक्रिया केंद्रात खेमानी नाल्याचे सांडपाणी आणून त्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावली जात आहे.
(३) व (४) खेमानी नाला वळविण्याच्या कामाकरिता नियोजित केलेली संप व पंपगृहाच्या जागेची मालकी सेन्चुरी रेयॉन कंपनीने उपलब्ध करुन दिली असल्याने, त्याअनुषंगाने जागा निश्चित करुन काम सुरु करण्यास कालावधी लागला ही वस्तुस्थिती आहे.

सदर कामासाठी नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराने डिसेंबर, २०१७ अखेरपर्यंत संप आणि पंपगृह तसेच १७०० मीटर उध्दरण वाहिनी अंबिकानगर नाल्यापर्यंत टाकून कार्यान्वित करण्यात आली होती. त्यामुळे जानेवारी २०१८ पासून उल्हासनदीत मिसळणारे खेमानी नाल्याचे पाणी बंद करण्यात आले आहे.

तसेच, दिनांक ०५.१२.२०१७ रोजी खेमानी नाल्याचे सांडपाणी वळविण्याचे काम जानेवारी २०१८ पर्यंत पूर्ण न केल्यास निविदेतील अटीनुसार प्रतिदिन रु. ५०,०००/- इतका दंड आकारण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते.

तथापि, सदर कामाची प्रगती मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्रमांक १०५८२/२०१७ मधील प्रतिज्ञापत्रानुसार होत असल्याने संबंधित कंत्राटदारावर दंड आकारण्यात आला नसल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांदिवली (पूर्व) ठाकूर व्हिलेज येथील अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर तात्पुरत्या स्वरुपाचे मिनी अग्निशमन केंद्र बांधण्याबाबत**

**(२५) १३००२६ (०७-१२-२०१८) श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (पूर्व) ठाकूर व्हिलेज येथील अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर तात्पुरत्या स्वरुपाचे मिनी अग्निशम केंद्र बांधण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, अग्निशमन दल, मुंबई यांचेकडे लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सद्य:स्थितीत कांदिवली (पूर्व) ठाकूर व्हिलेज येथील अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील एका जागेत तात्पुरत्या स्वरुपाचे मिनी अग्निशमन केंद्र दिनांक २२ एप्रिल, २०१८ पासून कार्यान्वित करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

### कर्नाटक राज्य मुक्त विद्यापीठाच्या (केएसओयू ) अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन पदविका प्राप्त केलेल्या उमेदवारांना मुंबई महानगरपालिका अभियांत्रिकी सेवेमध्ये सामावून घेण्याच्या निर्णयाबाबत

**(२६) १३०१११ (०७-१२-२०१८). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या नगर अभियंता खात्याचे परिपत्रक क्र. नअ/८६५४/चौकशी दिनांक २४ जुलै, २०१३ रोजी प्रसृत होण्यापूर्वी कर्नाटक राज्य मुक्त विद्यापीठाच्या (केएसओयू) अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन पदविका प्राप्त केलेल्या उमेदवारांना मुंबई महानगरपालिका अभियांत्रिकी सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सध्याच्या निर्देशित धोरणानुसार, महानगरपालिका सेवेत सरळसेवेने/खात्यांतर्गत सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदवी/पदविका प्राप्त करणाऱ्या ज्या उमेदवारांनी/कर्मचाऱ्यांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE)/तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थेमधून अभियांत्रिकी पदवी/पदविका प्राप्त केली आहे अशा कर्मचाऱ्यांचा/ उमेदवारांचा सरळसेवेने/ खात्यांतर्गत सरळसेवेने नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल असेल बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

### मुंबईतील ८१६ नर्सिंग होम अनधिकृत असून त्यामध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याबाबत

**(२७) १३०११९ (०७-१२-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ८१६ नर्सिंग होम अनधिकृत असून त्यात कोणतीही अग्निशमन यंत्रणा नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, अनधिकृत नर्सिंग होमवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नर्सिंग होम्स / रुग्णालयांची बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अन्वये महानगरपालिकेमार्फत नोंदणी केली जाते.

त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात १३७५ नर्सिंग होम्स असून, त्यापैकी १३३७ नर्सिंग होम्स नोंदणीकृत असून, ३८ नर्सिंग होम्स अनधिकृत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) एखाद्या नर्सिंग होमबाबत तक्रार प्राप्त झाली असेल अथवा ना-हरकत प्रमाणपत्राकरिता अर्ज प्राप्त झाल्यास अशा नर्सिंग होमची तपासणी करण्यात येते.
(३) सदर ३८ अनधिकृत नर्सिंग होम्समध्ये अग्निप्रतिबंधक उपाययोजना नसल्याचे आढळून आले असून, २८ नर्सिंग होम्सवर महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे व १० नर्सिंग होम्सना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवाहर विद्यालय पाण्याची टाकी ते अशोकनगर, कस्तूरबानगर,**
**सहयाद्री नगर डी.पी.रोड बनविण्याबाबत**

**(२८) १३०१४२ (०७-१२-२०१८). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवाहर विद्यालय पाण्याची टाकी ते अशोकनगर, कस्तूरबानगर, सहयाद्री नगर डी.पी.रोड बनविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.
(२) व (३) विकास आराखडा २०३४ मध्ये सदर जागी जवाहर विद्यालय ते पाण्याची टाकी दरम्यान १३.४० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता व पाण्याची टाकी ते अशोक नगर, कस्तुरबा नगर, सह्याद्री नगर दरम्यान १८.३० मी. रुंदीचा डी. पी. रस्ता प्रस्ताविला आहे.

त्यानुसार जवाहर विद्यालय पाण्याची टाकी ते अशोक नगर, कस्तुरबा नगर, सह्याद्री नगर दरम्यान १८.३० मीटर रुंदीचा नियमित रस्ता रेषेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबतची प्रक्रिया प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**कुलाबा (मुंबई) येथील जनरल जगन्नाथ भोसले मार्गावरील अभ्यासिका मद्यपी आणि जुगा-यांचा अड्डा बनल्याबाबत**

**(२९) १३०२४६ (०७-१२-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील जनरल जगन्नाथ भोसले मार्गावरील अभ्यासिका मद्यपी व जुगा-यांचा अड्डा बनला असल्याचे माहे सप्टेंबर,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ मध्ये बांधलेल्या अभ्यासिकेकडे महानगरपालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे या अभ्यासिकेची दुरवस्था झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अभ्यासिकेची दुरुस्ती करून तातडीने ती वापरात आणून तेथील मद्यपी व जुगा-यांवर कारवाई करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१९) :**

(१), (२) व (३) कुलाबा येथील जनरल जगन्नाथ भोसले मार्गावरील अभ्यासिका मद्यपी व जुगाऱ्यांच्या अड्डा बनला हे खरे नसून, सदर अभ्यासिका ही सुस्थितीत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडा प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणा-या इमारती बांधकामाची एसआयटी (बांधकाम तंज्ञामार्फत) मार्फत स्ट्रक्चरल ऑडीटसह चौकशी करणेबाबत**

**(३०) १३०२६१ (०४-१२-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणा-या इमारती बांधकामासाठी मे. शिर्के कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) अस्ल्यास, इमारत बांधकामासाठीचा दर प्रति चै. फुट रूपये ३,७००/- दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटदारामार्फत बांधण्यात येणा-या इमारतीचे बांधकाम हे अतिशय निकृष्ठ दर्जाचे असून त्याची एसआयटी (बांधकाम तंज्ञामार्फत) मार्फत स्ट्रक्चरल ऑडीटसह चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंत्राटदारामार्फत बांधण्यात येणा-या इमारतीच्या बांधकामाची एसआयटी (बांधकाम तंज्ञामार्फत) मार्फत स्ट्रक्चरल ऑडीटसह चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१९) :** (१) होय. मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंत्राटदाराची (ठेकेदाराची) नेमणूक म्हाडाने केलेली आहे.
(२) इमारतीच्या बांधकामासाठीचा दर सद्य:स्थितीत उंच इमारतींना (तळमजला+२४ मजले) अंदाजे रु. २५३३/- प्रति चौ. फुट इतका येतो.
(३) होय.
(४) सदर कामात वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याची वेळोवेळी तपासणी करण्यात येत असून, तपासणी अहवालानुसार सर्व साहित्य आवश्यक मानकानुसार बरोबर असल्याचे दिसून येते. तसेच वेळोवेळी सदर कामावर दक्षता व गुणनियंत्रण / प्राधिकरण विभागाकडुन पाहणी केलेली असून या विभागाकडून कोणतेही प्रतिकुल शेरे या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. यास्तव सदर कामाची एस.आय.टी. अथवा अन्य कोणत्याही व्यक्ती/संस्थेकडून पुनश्च: स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची आवश्यकता वाटत नाही असे म्हाडाने त्यांच्या अहवालात कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील रंकाळा तलाव शुध्दीकरणासाठी प्रायोगिक तत्वावर आयसीटी संस्थेने पतौडी खाणीवर सुरु केलेला प्रकल्प

**(३१) १३०२९८ (०५-१२-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील रंकाळा तलाव शुध्दीकरणासाठी प्रायोगिक तत्वावर आयसीटी संस्थेने पतौडी खाणीवर सुरु केलेला प्रकल्प महानगरपालिकेचे सहकार्य नसल्याने माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने हा प्रकल्प बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, हा प्रकल्प सुरु करण्याकरिता शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असलेला रंकाळा तलाव जल शुध्दीकरणासाठी सदर प्रकल्प सुरु करण्यात आला होता. तथापि, जल शुध्दीकरण करण्याकरीता आवश्यक असलेली यंत्र सामुग्री चालविण्यासाठी विद्युत पुरवठा जोडणी नसल्याने काही काळाकरीता प्रकल्प कार्यान्वित करता आला नसल्याची वस्तुस्थिती कोल्हापूर महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) सद्यस्थितीत महानगरपालिकेने विद्युत प्रवाह जोडणीकरीता आवश्यक केबल, तसेच यंत्रसमुग्रीकरीता शेड उपलब्ध करुन दिले आहे.

• सद्या पाण्याची गुणवत्ता ठिक असल्याने आवश्यकतेनुसार प्रकल्प चालविण्यात येत असल्याचे महानगरपालिकेच्या अहवाल नमूद आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई शहराच्या निर्मितीच्या रहिवासी व वाणिज्य स्वरूपाच्या मालमत्तांच्या नस्त्या सिडको व्यवस्थापनाकडून गहाळ झाल्याबाबत**

**(३२) १३०३०९ (०७-१२-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १०७० सालच्या सुमारास सिडकोने नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी दिघा पासून बेलापूर, खारघर पासून पनवेल, उरण पर्यंत सुमारे १ लाख ३८ हजार वाणिज्य, रहिवासी व सामाजिक यासहित बहुउद्देशिय इमारती उभारल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको व्यवस्थापनाकडून रहिवासी व वाणिज्य स्वरूपाच्या मालमत्तांच्या सुमारे १८ हजार नस्त्या गहाळ झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सिडको महामंडळाकडून एका संस्थेमार्फत करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात सुमारे २ हजार मालमत्ता विक्रीविना पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

सिडको महामंडळाने विविध विभागांमध्ये बांधलेल्या सदनिकांची अद्ययावत माहिती तयार करण्याच्या अनुषंगाने सर्व्हेक्षण करण्यासाठी मे.ध्रुव कन्सल्टंसी सर्व्हिसेस लि. या खाजगी संस्थेची ई-निविदेद्वारे दि.१९.१.२०१७ रोजी नेमणूक केली आहे.

सदर संस्थेने सर्व्हेक्षणाचा अंतरिम अहवाल सिडकोस जुलै,२०१८ मध्ये सादर केला आहे. सदर संस्थेने सादर केलेली माहिती व सिडकोच्या विविध विभागांकडून उपलब्ध माहिती या अनुषंगाने छाननी सुरु असून अंतिम अहवाल तयार करण्यात येत आहे.

(२) व (३) अशी बाब नाही.

रहिवासी व वाणिज्य स्वरुपाच्या मालमत्तांच्या गहाळ झालेल्या नस्त्या आणि किती मालमत्ता विक्रीविना पडून आहे याबाबत मे.ध्रुव कन्सल्टंसी सर्व्हिसेस लि. या खाजगी संस्थेमार्फत सर्व्हेक्षण करण्यात आले असून सर्व्हेक्षणाच्या अंतिम अहवालानंतर निश्चित संख्या ठरविण्यात येणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खारघर येथील सर्व्हे क्र.१८३ मधील कोयना प्रकल्पग्रस्तांना दिलेली ९.८१ हेक्टर जमीन अत्यल्प दराने विकासकाला विकल्याबाबत**

**(३३) १३०४५३ (०८-१२-२०१८) श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर येथील सर्व्हे क्र.१८३ मधील कोयना प्रकल्पग्रस्तांना दिलेली ९.८१ हेक्टर जमीन अत्यल्प दराने विकासकाला विकल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी निवृत्त्त न्यायाधीश श्री.किशोर रोही यांची एक सदस्यीय समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने यासंदर्भात पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच समितीचा अहवाल प्राप्त झाला नसल्यास, किती कालावधीत अहवाल प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय खरे आहे.

मौजे ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.१८३ मधील नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसूचित केलेल्या तथापि, संपादित न झालेल्या जमीन हस्तांतरणाची चौकशी करण्याकरीता श्री.किशोर जे. रोही, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची दि.२०.८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, श्री.किशोर जे.रोही यांनी वैद्यकिय कारणास्तव सदरहू जबाबदारी स्विकारण्यास असमर्थता दर्शविली असल्याने त्यांची नियुक्ती रद्द करुन (दि.२०.०८.२०१८ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन) त्यांच्याऐवजी श्री.आर.सी.चव्हाण, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची दि.०३.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर एकसदस्यीय समितीच्या कार्यकक्षेनुसार सिडको अधिसूचीत क्षेत्रातील कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या मौजे ओवे येथील सर्व्हे क्र.१८३ मधील जमिनींच्या व्यवहाराची तसेच गत १५ वर्षामध्ये या स्वरुपाचे व्यवहार झालेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यात आलेल्या अन्य प्रकरणांची चौकशी करुन ३ महिन्यांत अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदरच्या चौकशीचे स्वरुप पाहता विहित कालावधीमध्ये चौकशी पूर्ण होणे शक्य नसल्याने सदर समितीस तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

**चांदिवली व्हिलेज (मुंबई) येथील प्रभाग क्र.१५० मधील भूखंडावर आधार केंद्र बांधण्याबाबत**

**(३४) १३१३१० (०८-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदिवली व्हिलेज (मुंबई) येथील ५ टक्के नागरी सुविधेकरीता आरक्षित असलेल्या प्रभाग

क्र.१५० मधील भूखंडावर आधार केंद्र बांधण्याचा प्रस्ताव तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी मिळत नसल्याने प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ५ वर्षे हा प्रस्ताव महानगरपालिकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाला अद्‌याप मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, तातडीने या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) सीटीएस क्र. ३१/८/बी/१ व्हिलेज तुंगा प्रभाग क्रमांक १५० मधील भूखंडावर आधार केंद्र बांधण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु. ३५ लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून, पुढील प्रक्रिया सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**ठाणे महानगरपालिकेने बीएसयुपी योजनेतून लाभार्थ्यांना देण्यात आलेली घरे लाभार्थ्यांनी विक्री केल्याबाबत**

**(३५) १३१३२८ (०८-१२-२०१८) श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयात तुळशीधाम, सिध्दार्थनगर, खारटन, पडले गाव, ब्रह्मांड, कासारवडवली, टेकडी बंगला येथे ठाणे महानगरपालिकेने ३ हजार ६०८ घरे बांधली त्यापैकी ३ हजार ५४४ घरांचे वाटप बीएसयुपी योजनेतून लाभार्थ्यांना करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही लाभार्थ्यांनी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता बीएसयुपीची घरे परस्पर भाडयाने दिली व काही लाभार्थ्यांनी घरांची विक्री केल्याची माहिती दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बीएसयुपीची घरे भाडयाने देणा-या अथवा विकणा-यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त आदेशानूसार बीएसयुपी योजनेचा गैरफायदा घेणा-यांवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०२-२०१९) :** (१), (२), (३) व ४) होय, अंशत: खरे आहे

ठाणे महानगरपालिकेकडे बी.एस.यु.पी. योजनेच्या ४ DPR अंतर्गत एकूण ६५४९ घरकुलांची योजना मंजूर आहे. त्यापैकी ५४५३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून,४३३६ घरकुलांचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात आले आहे.

सदर योजनेतील सदनिका महानगरपालिकेची पूर्व परवानगी न घेता लाभार्थ्यांनी परस्पर भाड्याने देण्याच्या अथवा विक्री केल्याच्या तोंडी तक्रारी प्राप्त झाल्याने, महापालिका आयुक्त यांनी भरारी पथक नेमून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाअंती प्रथम टप्प्यात ५४ लाभार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्थानकास लेखी कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये दिलेला कोटयवधीचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(३६) १३१३४४ (०८-१२-२०१८) श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बसवराज पाटील (औसा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला कोटयवधीचा निधी अखर्चित असून नगरविकास विभागाने माहे जून, २०१८ पर्यत निधी खर्चाचे आदेश दिल्यानंतरही हा निधी खर्ची करण्यात प्रशासनास अपयश आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नगरपालिकांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ ची अंतिम मुदतवाढ नगरविकास विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा तपशील काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१९) :** (१), (२) व (३)

• दिनांक १२ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये २०१४-१५ व २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना नगर विकास विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला व अखर्चित असलेला निधी खर्च करण्यास दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

• दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये सन २०१४-१५ व २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना नगर विकास विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला तथापी अद्याप अखर्चित असलेल्या निधीमधील ज्याठिकाणी दिनांक ३० जून, २०१८ पुर्वी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे, असा निधी खर्च करण्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती.

• तथापी, दिनांक १५ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना नगर विकास विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला व अद्याप अखर्चित असलेला निधी खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत अंतीम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

---

**मुंबई महानगरपालिका संचालित उर्दू माध्यमातील उंमर रज्जब शाळा इंग्रजी शाळेत रूपांतरित करण्याबाबत**

**(३७) १३१४०८ (०८-१२-२०१८) ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) उंमर रज्जब रोड, मदनपुरा येथील मुंबई महानगरपालिका संचालित उर्दू माध्यमातील उंमर रज्जब शाळा इंग्रजी शाळेत रूपांतरित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री (अल्पसंख्याक विकास) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंग्रजी माध्यमाच्या कॉन्व्हेंट शाळा प्रचंड डोनेशन, प्रवेश शुल्क आकारत असल्याने स्थानिक मध्यमवर्गीय/गरीब जनता आपल्या पाल्यांना सदरहू शाळांत प्रवेश घेण्यास असमर्थ ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक मुलांच्या शैक्षणिक भविष्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून आकारावयाच्या शुल्काबाबत कॅपीटेशन फी ॲक्ट-१९८७, महाराष्ट्र शुल्क विनियमन अधिनियम २०११, तसेच, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात येते.

भायखळा (मुंबई) येथील उमर रज्जब मार्ग मनपा उर्दू शाळा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चालविली जात असून, सदर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे महानगरपालिकेमार्फत पुरविले जाणारे सर्व फायदे सदर शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येतात.

तसेच, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सदर शाळेमध्ये महानगरपालिकेमार्फत मुंबई पब्लिक स्कूल शाळा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार शहरामधील (जि.पालघर) डम्पिंग ग्राउंड इतरत्र हलविण्याबाबत**

**(३८) १३१६३७ (०८-१२-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) पर्यटनस्थळांसमोर कचरा टाकत असल्यामुळे पर्यटकांना दुर्गंधीचा सामाना करावा लागतो तसेच परिसरातील नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे डम्पिंग ग्राऊंड जव्हार शहरातून इतरत्र हलवावे या मागणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी जव्हार नगरपरिषदेवर वेळोवेळी मोर्चा काढून डम्पिंग ग्राऊंड हटविण्याबाबत वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) अशी बाब नाही.

- नगरपरिषद क्षेत्रात साठवणूक केलेल्या कचऱ्यापासून नागरीक व पर्यटन यांना दुर्गंधीचा सामना करावा लागणार नाही अथवा त्यापासून आरोग्यास हानी पोहचणार नाही यासाठी डंम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर वेळोवेळी नियमीतपणे जंतूनाशकाची फवारणी करण्यात येते, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) अशा प्रकारची मागणी वारंवार होत आहे, हे खरे आहे.
(३) विकास आराखड्यातील आरक्षण क्र.४९ (हिंदु स्मशानभुमी) मधील १०० गुंठे जागेपैकी ६० गुंठे जागा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षीत करण्याच्या अनुषंगाने सदर आरक्षणामध्ये किरकोळ बदलाची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) शहरातील भाजीमार्केटच्या इमारतीची बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबत

**(३९) १३१८३३ (०८-१२-२०१८) श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीचे कलम ६.६.२ नुसार नियम क्रमांक ६.२.६.१ अन्वये मान्य होऊ शकणाऱ्या बांधकाम प्रस्तावासाठी मुख्य अग्निशामक अधिकारी यांनी तो प्रस्ताव तपासला पाहिजे व त्यांनी नाहरकत पत्र दिल्यानंतर मुख्याधिकारी यांनी इमारत परवाना द्यावयाचा असताना कणकवली शहरातील (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) आरक्षण क्रमांक २५ भाजीमार्केट विकसित करणाऱ्या संबंधित विकासकाने मुख्य अग्निशामक अधिकारी यांचेकडून नाहरकतपत्र प्राप्त केलेले नसताना मुख्याधिकारी कणकवली यांनी दिलेली बांधकाम परवानगी ही अनधिकृत व नियमबाह्य ठरते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्याधिकारी कणकवली यांनी दिलेल्या बांधकाम परवानगीत प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करत असताना सामासिक अंतराव्यतिरिक्त भाजीमार्केट इमारतीकरीता ६ मीटर रुंदीचा विभक्त पोचमार्ग सोडण्याचा व त्यामध्ये अन्य कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय नसल्याचे नमूद केलेले असताना संबंधित विकासकाने ६ मीटर रुंदीचा पोचमार्ग सोडलेला नाही व बांधकाम परवानगीतील अटी शर्तीचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास मुख्यमंत्री व नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे तक्रार केली होती आणि सदर तक्रारीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना अहवाल बनविण्याचे आदेश नगरविकास राज्यमंत्री यांनी दिले होते तथापि अद्यापपर्यंत प्रधान सचिवांनी आपला अहवाल सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी su-moto याचिका दाखल करून घेण्यासंदर्भात दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी श्री.अनुपम कांबळी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचे लक्ष वेधले होते व मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजी पत्रान्वये जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या होत्या तथापि अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी वर नमूद प्रकरणी अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुख्याधिकारी कणकवली यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये दिलेली नियमबाह्य बांधकाम परवानगी रद्द करून सदर अनधिकृत बांधकाम किती कालावधीत निष्कासित करणार आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) सदर भाजीमार्केट करीता प्रस्तावित इमारतीच्या जोत्याचे क्षेत्र ५०० चौ.मी. पेक्षा कमी आहे. त्यामुळे नियमानुसार अग्निशामक विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याने नगरपंचातीने काही अटी व शर्तीच्या अधिन राहून बांधकाम परवानगी दिली असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

(२) बांधकाम परवानगी पुरक आदेश अट क्र.७ नुसार तसेच विकास करारपत्रातील अट क्र.३४ नुसार ६ मी. पोच मार्ग कायम खुला ठेवणे व सदर पोच मार्गाखालील क्षेत्र त्याच प्रयोजनाकरीता वापरणे विकासकास बंधनकारक राहील, असे नमूद करण्यात आले असल्याचे नगरपंचायतीच्या अहवालात नमूद आहे.

(३), (४) व (५) अशा आशयाचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत प्राप्त झाले, ही वस्तुस्थिती आहे.

• सदरहू प्रकरणी सर्वंकष अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वांद्रे (पूर्व) मुंबई येथील चेतना कॉलेजच्या पदपथावरील अतिक्रमणाबाबत

**(४०) १३२०३३ (१०-१२-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील पदपथावरील अतिक्रमणे काढण्यात येऊ नये असे आदेश शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे (पूर्व) मुंबई येथील चेतना कॉलेजच्या पदपथावरील अनधिकृत अतिक्रमणाबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान वा त्यानंतर या विभागाच्या वार्ड ऑफिसर यांचेकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा. न्यायालयाचे पदपथावरील अतिक्रमणांबाबत काय निर्देश आहेत,
(४) असल्यास, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील चेतना कॉलेजच्या पदपथावरील अतिक्रमणाबाबत या विभागातील वार्ड ऑफिसर यांनी मा. न्यायालयाचे निर्देश लक्षात घेता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील चेतना कॉलेजच्या पदपथावरील अतिक्रमणाबाबत या विभागातील वॉर्ड ऑफिसर यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्यास संबंधित वॉर्ड ऑफिसर यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) मा. उच्च न्यायालयाने विविध जनहित याचिकांमध्ये कायद्याच्या विहित पध्दतीचा वापर करुन पदपथावरील अतिक्रमण काढण्यास आदेशित केले आहे.
(४) व (५) चेतना कॉलेज लगतच्या पदपथावरील सुमारे ४० अनधिकृत दुकाने/झोपडयांवर दिनांक ३०.१२.२०१६, २९.०३.२०१७, २८.०४.२०१७, ०५.०२.२०१८ व दिनांक १२.११.२०१८ रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, सदर पदपथ दैनंदिन निरिक्षणाखाली ठेवण्यात आला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कल्याण (ता.जि.ठाणे) येथील बिर्ला कॉलेज परिसरातील इंदिरानगर येथील बीएसयूपी योजनेतील घरे बाधित कुटुंबांना उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४१) १३२८१४ (०४-१२-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (ता.जि.ठाणे) येथील बिर्ला कॉलेज परिसरातील इंदिरानगर झोपडपट्टी सन २०१० मध्ये बीएसयूपी योजनेत समाविष्ट करण्यात आली असुन या प्रकल्पात ३३० कुटूंबे बाधीत झाली असुन यापैकी १४७ कुटूंबाना दोन वर्षापूर्वी प्रत्यक्ष घरे मिळाली मात्र १८३ कुटूंबे अदयापही घरांच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त १८३ कुटूंबांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. केंद्र शासनाच्या बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत इंदिरानगर कल्याण (प.) येथील सर्व्हेक्षणात ३७६ झोपडीधारक होते. इनसीटू बांधकामामुळे ३३२ झोपडीधारक बाधीत झाले असून, त्यामध्ये २९९ झोपडीधारक व ३३ दुकानाचा समावेश आहे. ३३२ झोपडीधारकांपैकी २२९ झोपडपट्टीधारकांना सबळ पुराव्याच्या आधारे लाभार्थी म्हणून घोषित केले असून, २२९ झोपडीधारकांपैकी लाभार्थी हिस्सा जमा केलेल्या १८१ झोपडीधारकांना सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत. उर्वरित ४८ पात्र लाभर्थ्यांत २८ गाळेधारकांचा समावेश असून,त्यांना गाळे वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच लाभार्थी हिस्सा जमा केल्यावर २० पात्र लाभार्थ्यांना सदनिका वाटपाची कार्यवाही केली जाणार आहे.

(२) सदर योजना केंद्र शासनाने बंद केली असली, तरी लाभार्थी निवडी संदर्भात तक्रारीचे निराकरण करण्यासाठी महानगरपालिकेने केलेल्या ठरावान्वये अपात्र ठरलेल्या १४७ झोपडीधारकांच्या कागदपत्रांची पुनश्च: छाननी करण्याकरिता दिनांक १२.०९.२०१८ च्या आदेशान्वये उप आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी निवड समिती पुर्नगठीत केलेली असून, सदर समितीचे पुरावे तपासणीचे कामकाज सुरु आहे.
(३)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मे. ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.कंपनीने (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरणाच्या शासकीय जागेतून अनधिकृतरीत्या पोचमार्ग तयार केल्याबाबत**

**(४२) १३२८२५ (१०-१२-२०१८) श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.कंपनीला सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरण (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) क्षेत्रातील वाणिज्यिक भूखंड क्रमांक ८२/१ मध्ये दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्यात आली व त्यावेळी मंजूर केलेल्या नकाशात ओरोस-जाधववाडी लगत १५ मीटरचा पोचमार्ग दर्शविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विकासकाने पुल व शिवाजी पुतळा यांच्या मधोमध सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरणाच्या शासकीय जागेतून अनधिकृतरीत्या आपल्या मिळकतीसाठी पोचमार्ग तयार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृतरीत्या पोचमार्ग तयार केलेली सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरणाची जागा ही रिक्षा स्थानकासाठी प्रस्तावित असून प्रादेशिक परिवहन कार्यालयाने त्यासंदर्भात प्राधिकरणाशी पत्रव्यवहार देखील केलेला आहे आणि संबंधित विकासकाने आपल्या मिळकतीकडे जाण्यासाठी याच जागेतून अनधिकृतरीत्या पोचमार्ग तयार केल्याने रिक्षास्थानकाच्या प्रस्तावित जागेमध्ये अडथळा निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मे. ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. कंपनीने आपल्या मिळकतीकडे जाण्यासाठी अनधिकृतरीत्या तयार केलेला हा पोचमार्ग तात्काळ बंद करून रिक्षा स्थानकासाठी प्रस्तावित

असलेली प्राधिकरणाच्या मालकीची जागा तात्काळ मोकळी करण्याबाबत श्री. अनुपम कांबळी यांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अनधिकृतरीत्या तयार केलेला पोचमार्ग बंद करून सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरणाच्या मालकीची जागा किती कालावधीत मोकळी करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९)** :(१) सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील वाणिज्यिक भूखंड क्रमांक ८२/१ मधील क्षेत्र ९३८२ चौ.मी. इतका भूखंड मे. ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. ठाणे यांना ९९ वर्षाच्या भाडे करार तत्वावर मंजूर करण्यात आला आहे.

• सदर भूखंडावर बांधकाम करण्यासाठी कंपनीने अर्ज केला असता दि.१३/०५/२०१६ रोजीच्या आदेशान्वये बांधकाम परवानगी दिली असल्याची वस्तुस्थिती सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरणाने कळविली आले.

(२) सदर भूखंडावर इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने तसेच इमारतीकडे जाण्या-येण्यासाठी अन्य मार्ग नसल्याने कंपनीने तात्पुरत्या स्वरुपात रस्ता तयार केल्याचे प्राधिकरणाच्या अहवालात नमूद आहे.

(३) सदर भूखंडालगत असलेली खुली जागा रिक्षा स्थानकासाठी देणेबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत ठरविण्यात आले असल्याचे व यानुषंगाने परिवहन कार्यालयाशी पत्र व्यवहार केला असल्याची वस्तुस्थिती प्राधिकरणाने कळविली आहे.

(४) व (५) अशा आशयाची तक्रार प्राधिकरणास प्राप्त झाली, हे खरे आहे.

• प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर जागेची पहाणी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याच्या सूचना प्राधिकरणामार्फत तहसिलदार, कुडाळ यांना दिले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याचे प्राधिकरणाने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत वर्षभरात जमा होणाऱ्या कचऱ्याची शोस्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत

**(४३) १३३१९३ (१०-१२-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हदीत वर्षभरात जमा होणाऱ्या सुमारे ८३ लाख टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सुमारे २ हजार ८४० कोटी रुपये खर्च करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८३ लाख टनांपैकी केवळ ३२ लाख टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कचाऱ्याची शोस्त्रोक्त पध्दतीने शंभर टक्के विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सन २०१७-१८ च्या वार्षिक अहवालानुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत वर्षभरात सुमारे ८३ लाख टन कचरा निर्माण होत आहे.
(२) सदर कचऱ्यापैकी ४५ लाख टन कचऱ्यावर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत प्रक्रिया करण्यात येत आहे.
(३) स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या १००% कचऱ्याचे निर्मितीच्या जागीच ओला व सुका कचरा असे विलगिकरण करणे, ओल्या (विघ्ज्ञटनशील) कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया करणे व सुक्या कचऱ्याचे पुन्हा विविध घटकांमध्ये वर्गीकरण करून तो पुन्ह:प्रक्रीयेसाठी पाठविणे या तत्वावर आधारित राज्यातील सर्व शहरांचे घनकचरा व्यवस्थापनाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहेत. त्यानुसार, आता पर्यंत राज्यातील २५४ शहरांचे रु.२६५३.०२ कोटी एवढ्या रकमेचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उल्हासनगर (जि. ठाणे) महानगरपालिकेत घनकचरा व्यवस्थापनेची समस्या निर्माण झाली असल्याबाबत

**(४४) १३३२८२ (१०-१२-२०१८) श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि. ठाणे) महानगरपालिकेत घनकचरा व्यवस्थापनेची समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाली असून शहरातून रोज ४०० टन पेक्षा जास्त कचरा निर्माण होतो व सदरचा घनकचरा उचलण्यासाठी महानगरपालिका संबंधित ठेकेदाराला दररोज ४ लाख ५० हजार रुपये दर दिवसाला देते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक प्रशासनाने काही वर्षापूर्वी शांतीनगर व खेमानी येथील राणा खदान, कांबा येथील २५ हेक्टरचा भूखंड डम्पींग ग्राउंडसाठी उपलब्ध करुन दिला होता पण रहीवाशांच्या विरोधानंतर उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथील मोकळया जागेत कचरा टाकण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरात कचरा टाकण्यासाठी जागा शिल्लक नसून धूर व दुर्गंधीमुळे नागरीकांना श्वसनाचा त्रास, डोळे सुजणे अशा गंभीर आजारांचा सामना करावा लागतो मात्र डम्पींग ग्राउंडच्या जागेबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१९) :** (१) उल्हासनगर शहरातून दैनंदिन २०० मे. टन ओला कचरा, १०६ मे. टन सुका कचरा व ५४ मे. टन माती/ खडीचा कचरा असा एकूण ३६० मे. टन घनकचरा निर्माण होतो.

सन २०१३-१४ पासून उल्हासनगर शहरातील दैनंदिन घनकचरा वाहतूक कामासाठी संबंधित ठेकेदार यांना प्रतिदिन रु. ४.४६ लाख इतका खर्च दिला जात असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सन १९९६-९७ पूर्वी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत शांतीनगर येथील जागेचा डंपिंग ग्राऊंड म्हणून वापर करण्यात येत होता.

तथापि, सदर जागेची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्यानंतर सन १९९६-९७ पासून खेमानी येथील राणा ट्रेडिंग कंपनी जवळ, म्हारळ गाव जवळील खदानीत कचरा निर्गत करण्यात येत होता.

सदर डंपिंग ग्राऊंडची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्याने व पर्याय उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ०३.१०.२०१६ पासून खडी मशीन, गायकवाड पाडा, उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथील पडीत खाणीत कचरा निर्गत करण्यात येत आहे.

(३) उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथील खडी मशीन भूखंडावर कचरा टाकण्यास बंद करण्याची मागणी स्थानिक नागरिक उल्हासनगर महानगरपालिकेकडे करीत आहेत.

सदर भूखंडाची कचरा सामावून घेण्याची क्षमता अंदाजे २ वर्षे इतकी असून, सदर डंपिंग ग्राऊंडवर दररोज २ पोकलेन व २ डोझर मशीनद्वारे कचऱ्याचे सपाटीकरण करुन बायोकल्चर पावडर व सोल्युशन टाकण्यात येत आहे. तसेच, बायोसॅनिटायझरद्वारे प्रक्रिया करुन दुर्गंधीनाशक व कचऱ्याचा थर कमी करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे.

कचरा निर्मितीच्या ठिकाणी कचरा विलगीकरण आणि सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या कामास मे. दि आर्ट ऑफ लिवींग श्री श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, बेंगळुरु यांची १ वर्षासाठी अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यात आली आहे.

आजुबाजूच्या संपूर्ण परिसरात जंतुनाशक/ किटकनाशक फवारणी करण्यात येत असून, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर परिसरात आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात येत असते.

तसेच, उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनाच्या सविस्तर प्रकल्प आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

(४) व (५) घनकचरा व्यवस्थापनासाठी मौजे उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील सर्व्हे नं. ५०/१ एकूण क्षेत्र १२-५१-०० हेक्टर सर्व्हे नं. ६२ क्षेत्र १३-०१-०० हेक्टर जागेपैकी ३० एकर सलग जागा अतिक्रमणे व इतर अधिकार वगळून नाममात्र दराने अथवा भोगाधिकार मुल्यारहित व महसुलमुक्त मिळण्याबाबत तसेच, सदर जमिनीचा आगाऊ ताबा महानगरपालिकेस मिळणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**श्री. गुरू हावगीस्वामी मठ संस्थानांस तिर्थ क्षेत्राचा "ब" दर्जा मिळणेबाबत**

**(४५) १३४००८ (०४-१२-२०१८) डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील पुरातनकालीन असलेले श्री. गुरू हावगीस्वामी मठ संस्थान येथे वर्षातून तीन वेळा मोठया प्रमाणात यात्रा भरते या यात्रा महोत्सवासाठी महाराष्ट्र, तेलंगणा , आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यातून लाखो भाविक या ठिकाणी येत असतात मात्र महोत्सवात येणा-या भाविकांची सुविधे अभावी गैरसोय होत असल्याने याठिकाणी श्री. गुरू हावगीस्वामी मठ संस्थानास तिर्थ क्षेत्राचा "ब" दर्जा मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार वैज्ञानिक विकास महामंडळ यांच्या माध्यमातून विकास निधी व नागरी सुविधा देण्यासह या तिर्थक्षेत्राला "ब" दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) (२) (३)

•श्री. गुरू हावगीस्वाणमी मठ संस्थारनास तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यासंदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

•याबाबतच्या प्रस्तावाची शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार तपासणी करण्यात येत आहे.

---

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या नायर रुग्णालयातील गैरकारभाराबाबत**

**(४६) १३४५२५ (०५-१२-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या विविध रुग्णालयांमध्ये विशेषत: डॉ.वा.ल.नायर रुग्णालयात शिक्षण घेणाऱ्या विद्‌यार्थ्यांना नाहक त्रास देणे, रुग्णांना अपुरी वैद्‌यकीय सेवा देणे तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख यांच्या गैरकारभाराबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व नगरविकास विभागाकडे माहे नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान तक्रारी केल्या असून महानगरपालिकेकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने सुरु असलेली चौकशीची सद्‌यस्थिती काय आहे,
चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने न्यायवैद्‌यक विभागाच्या प्रमुखांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागातील गैरप्रकाराबाबत विविध तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत असून, चौकशीचे कामकाज अंतिम टप्प्यात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**कल्याण (पूर्व) (ता.कल्याण, जि. ठाणे) येथील गावदेवी रोड, आदर्श नगर येथे स्मशानभुमीसाठी जागा राखीव ठेवली असल्याबाबत**

**(४७) १३४५२६ (०५-१२-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (पूर्व) (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील गावदेवी रोड, आदर्श नगर येथे महानगरपालिकेने गत ६ ते ७ वर्षापूर्वी स्मशानभुमीसाठी जागा राखीव ठेवली असून त्याकरीता शासनाकडून निधीही महानगरपालिकेस प्राप्त झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मशानभुमिसाठी राखीव असलेल्या व निधी प्राप्त असूनसुध्दा काही विकासकांसाठी तेथे माहे सप्टेंबर, २०१८ पर्यंत बांधकाम केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावदेवी रोड, आदर्श नगर येथे विकासकांनी बऱ्याच मोठ्या इमारती बांधल्या असून महानगरपालिकेने ६-७ वर्षापूर्वी करावयाच्या स्मशानभुमीच्या बांधकामास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सुरु असलेले बांधकाम बंद करुन स्मशानभुमी इतत्र हलविण्याबाबत तसेच उक्त प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१९) :** (१) व (२)
• कल्याण (पूर्व) येथील गावदेवी रोड, आदर्शनगर येथे आरक्षण क्र. ४४३ ही जागा स्मशानभुमीसाठी राखीव आहे.
• सदर स्मशानभुमीसाठी शासनाकडून महानगरपालिकेस निधी देण्यात आलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४)
• गावदेवी रोड आदर्शनगर या भागात बऱ्याच मोठ्या इमारती बांधलेल्या असून तेथील स्मशानभुमीचे बांधकाम झाले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
• सदर स्मशानभुमी इतरत्र हलविण्याबाबत कोणतीही कार्यवाही सुरू नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

**पुणे, बावधन बुद्रुक येथील पुराणिक्स अबितांते फेज-१ ए, फेज-१ बी बांधकाम प्रकल्पाबाबत**

**(४८) १३४७६० (०५-१२-२०१८) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, बावधन बुद्रुक येथील पुराणिक्स अबितांते फेज-१ ए, फेज-१ बी या बांधकाम प्रकल्पाकरिता आवश्यक ते सर्व शासकीय परवाने घेतले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे, बावधन बुद्रुक येथील पुराणिक्स अबितांते फेज-१ ए, फेज-१ बी या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून माहे एप्रिल, २०१९ पर्यंत सदनिकांचा ताबा देण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रकल्प अनेक शासकीय परवानग्यांविना साकारत असतांना संबंधित प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पासाठी अतिशय महत्वाचे असलेले अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर एनओसी देताना ती अनियमितपणे दिली गेली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) ते (५) हे खरे नाही. सदर प्रकल्पास जिल्हाधिकारी पुणे यांनी दि. ४/१/२०१३ व २०/८/२०१४ रोजी परवानगी दिलेली आहे. सदर परवानगी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि.३०/८/२०१७ रोजी सुधारित केलेली आहे. सदर प्रकल्पातील इमारतींना पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून दि.१५/०१/२०१४ रोजीचे पत्र क्र. FB/४७७ अन्वये तात्पुरते (Provisional) फायर विषयक ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त असून दि.०८/१०/२०१८ रोजीचे पत्र क्र. FB/२७४८ अन्वये अंतिम फायर विषयक ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त आहे.

उपरोक्त ना -हरकत दाखला तसेच आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर सदर प्रकल्पातील १ ए व १ बी इमारतीस प्राधिकरणाने दि.१९/१०/२०१८ रोजी भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्वेनगर, पुणे येथे लेन नं.११, सर्व्हे नं.९ येथील भूखंडातील विकास आराखड्यातील रस्त्यावर अतिक्रमण करून इमारत बांधण्यात आल्याबाबत**

**(४९) १३४७६२ (०५-१२-२०१८) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्वेनगर (पुणे) येथे लेन नं.११, सर्व्हे नं.९ येथील भूखंडातील विकास आराखड्यातील रस्त्यावर अतिक्रमण करून इमारत बांधून त्यातील सदनिकांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचा डीपी रस्ता जवळपास बंद करण्यात आला असून त्यावर इमारतीचे बांधकाम उभारले असून याकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) पुणे, कर्वेनगर स.नं.९ येथे मंजूर विकास आराखड्यानुसार १२, १५ व ३६ मी. रस्ता नियोजित आहे. तथापि सदर ठिकाणी नियोजित रस्ता रुंदी मध्ये कोणतेही बांधकाम चालू नाही. तसेच कर्वेनगर स.नं. ९ मधील लेन नं. ११ येथे मान्य विकास योजना आराखड्यानुसार कोणताही रस्ता नियोजित नाही असे, पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थांच्या गणवेश व शालेय साहित्य तसेच खाऊ वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५०) १३४७६३ (०५-१२-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थांच्या सन २०१७-२०१८ या वर्षात गणवेश व शालेय साहित्य, खाऊ वाटपात गैरव्यवहार झाल्याची बाब मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, थेट हस्तांतर योजनेत कंत्राटदाराने शाळांमधील विद्यार्थांना वाटपामध्ये निकृष्ट शालेय साहित्य व गणवेश पुरविल्याचे दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या खाऊ वाटपात बिस्कीट पुडा हा एमआरपीपेक्षा अधिक जास्त दराने खरेदी करून वाटप करण्यात आल्याचेही निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५४८ (४२)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) व (२)

• पुणे महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य थेट हस्तांतरण योजनेंतर्गत (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) पुरविण्यात आले आहे.

• यातील पुरवठाधारकांपैकी काही पुरवठाधारकांनी निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरविल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने तपासणी केली असता, सदर दप्तरांची शिलाई निकृष्ट दर्जाची असल्याचे निदर्शनास आले.

• अशा प्रकरणी संबंधीत पुरवठा धारकांकडून विद्यार्थ्यांना दप्तरे बदलून देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

• तसेच सदर पुरवठाधारकांचा पुणे महानगरपालिकेच्या काळ्या यादित समावेश करण्यात आला आहे.

(३) व (४)

• दि.०७.०१.२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये बिस्किटचे पुडे खरेदी करण्यासाठी कार्यादेश देण्यात आले होते. यामध्ये छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने बिस्किट पुड्यांची खरेदीबाबत सदर कार्यादेश झाले असल्याचे निदर्शनास आले होते.

• या प्रकरणी एमआरपीपेक्षा जादा दराने कार्यादेश देण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.